# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

# नोटीस

विषय :— अंतिम वर्षाच्या परीक्षा व निकाल जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ आवारातील वसतिगृह खोलीचा ताबा सुपूर्त करणेबाबत...

संदर्भ :— वसतिगृह कार्यालयाचे परिपत्रक क. २२५/२०२० दिनांक — ०६/०८/२०२०
१) वसतिगृह नोटीस दिनांक २५/०९/२०२०
२) वसतिगृह नोटीस दिनांक २३/११/२०२०
३) वसतिगृह नोटीस दिनांक १८/०१/२०२१
४) वसतिगृह नोटीस दिनांक १२/०६/२०२१

या नोटीसद्वारे सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारातील वसतिगृहामध्ये शैक्षणिक वर्ष २०२०—२१ मध्ये प्रवेशित असणाऱ्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपुष्टात आलेल्या आहेत तसेच निकालही जाहीर झालेले आहेत. तथापि वसतिगृहात राहात असलेल्या विद्यार्थ्यांनी वरील संदर्भीय परिपत्रक व वारंवार सूचना देवूनही वसतिगृह खोलीचा ताबा वसतिगृह कार्यालयाकडे सुपूर्त केलेला नाही. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२१—२२ वसतिगृह प्रवेशाचे नियोजन करणे तसेच वसतिगृह देखभाल व दुरूस्ती इत्यादी कामे करणे गैरसोयीचे होत आहे.

वसतिगृह कार्यालयाकडून वसतिगृह खोलीतील साहित्य घेवून जाण्यासाठी परिपत्रक क्रमांक २२५/२०२० प्रमाणे प्रकिया पुर्ण करणे अनिवार्य आहे, याची कृपया नोंद घ्यावी. कृपया सदरील परिपत्रकातील शैक्षणिक वर्ष २०१९—२० ऐवजी २०२०—२१ असे गृहित धरावे. वरील नमूद केलेली सर्व परिपत्रके व नोटीसा **www.unipune.ac.in** या संकेतस्थळावर **students corner** मध्ये **Hostel office** येथे उपलब्ध आहेत, याची विद्यार्थ्यांनी कृपया नोंद घ्यावी.

ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह खोलीतील संपूर्ण साहित्य घेतलले आहे अशा विद्यार्थ्यांनी स्वतःच्या संपूर्ण तपशीलासह (नाव, विभाग, वसतिगृह व खोली क. इत्यादी) **chiefrector@unipune.ac.in** या ई—मेल आय डी वर **" संपूर्ण साहित्य घेतले आहे " ( The entire luggage has been taken )** अशा आशयाचा ई—मेल पाठवावा.

जे विद्यार्थी ०५ ऑक्टोंबर, २०२१ या दिनांकापर्यत सदरील वसतिगृह खोलीचा ताबा वसतिगृह कार्यालयाकडे सुपूर्त करणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे वसतिगृह खोलीमधील साहित्य पंचनामा करून वसतिगृह कार्यालय व सुरक्षा विभाग यांच्या संयुक्त देखरेखीखाली वसतिगृह सामान कक्षात ठेवण्यात येईल. सामान कक्षात ठेवलेल्या साहित्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची असेल, याची कृपया नोंद घ्यावी

मुख्य वसतिगृह प्रमुख

मुख्य वसतिगृह प्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११००७.

गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
सा.फु.पु.वि/वसतिगृह/२०२१—२२/८०३
दिनांक :— २८/०९/२०२१

प्रत माहितीसाठी सादर :—

१) मा. कुलसचिव :— सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे— ०७

२) मा. विभागप्रमुख :— आपल्या विभागातील वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावे, ही विनंती.

३) मा. संचालक, सुरक्षा :— आपल्या माहितीत्सव व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.